9

महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्था, परेल, मुंबई या संस्थेचे नांव बदलून संस्थेला " कै.नारायण मेघाजी लोखंडे श्रम विज्ञान संस्था" असे नवीन नांव देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग
शासन निर्णय क्र.संकीर्ण-२००७/प्र.क्र.५९५/कामगार-६
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- १९ जुलै,२००८

**वाचा:-** प्रबंधक, महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्था, परेल, मुंबई यांचे पत्र क्र.मश्रविसं /३३३४, दि.१९/७/२००७.

**शासन निर्णय :-** "महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्था" दादाभाई चमारबागवाला मार्ग, परेल, मुंबई - ४०० ०१२ ही महाराष्ट्र शासनाची संस्था आहे. सदर संस्था कामगार क्षेत्रामध्ये शिक्षण, प्रशिक्षण व संशोधन यासंबंधी कार्यरत असून, संस्थने राज्यस्तरावरील पदव्युत्तर शिक्षण संस्था म्हणून नावलौकिक मिळविलेला आहे. सदर संस्था राज्यामध्ये व राज्याबाहेर देखील कामगार क्षेत्रातील एक प्रतिथयश संस्था म्हणून ओळखली जाते. या संस्थेची स्थापना तत्कालीन मुंबई प्रांताचे कामगार मंत्री मा. श्री.गुलजारीलाल नंदा यांच्या प्रेरणेने १९४७ साली "बॉम्बे लेबर इन्स्टिटयुट" या नावाने झाली व औद्योगिक जगतातही याच नावाने संस्था कार्यरत होती. दि.३१ मार्च, १९७६ पासून संस्थेच्या नावात बदल करुन तिचे नामकरण "महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्था" असे करण्यात आले. मुंबई विद्यापीठ कायदा, १९७४ च्या कलम ४६ नुसार संस्थेमध्ये मास्टर ऑफ लेबर स्टडीज् हा २ वर्षांचा पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम मुंबई विद्यापीठाच्या मान्यतेने व संलग्नतेने सुरु करण्यात आला.

२. सदर संस्थेमध्ये "कामगार संघटना व औद्योगिक संबंध" या विषयाचा ९ महिन्यांचा पदविका अभ्यासक्रम आणि मास्टर ऑफ लेबर स्टडीज् (एमएलएस) हा २ वर्षांचा पदव्युत्तर पदवीचा मुंबई विद्यापीठाची मान्यता असलेला अभ्यासक्रम चालविण्यात येतो. सदर संस्थेत अभ्यासक्रम पूर्ण करणा-या विद्यार्थ्यांना कामगार कल्याण व मनुष्यबळ विकास या क्षेत्रामध्ये नोकरीच्या उत्तम संधी प्राप्त होतात.

३. कै.नारायण मेघाजी लोखंडे यांनी कामगार क्षेत्रामध्ये केलेल्या योगदानाची दखल महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्थेने यापूर्वीच घेतलेली असून कै.नारायण मेघाजी लोखंडे यांच्या नांवाने स्मृती व्याख्यानमाला सुरु केलेली आहे. कै.नारायण मेघाजी लोखंडे यांनी कामगार क्षेत्रामध्ये केलेल्या भरीव कार्याची नोंद घेऊन त्यांचे नांव महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्थेला देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती. सदर पार्श्वभूमीवर "महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्था" दादाभाई चमारबागवाला मार्ग, परेल, मुंबई या संस्थेचे नांव बदलून सदर संस्थेचे नामकरण आता **"कै.नारायण मेघाजी लोखंडे महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्था"** असे करण्यात येत आहे. हे आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(रा.बा.घाडगे)
शासनाचे अवर सचिव

प्रति,

मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
मा.मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव
मा.राज्यमंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव
प्रधान सचिव (कामगार) यांचे स्वीय सहाय्यक, उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
उप सचिव (कामगार-६), उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
संचालक, महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्था, परेल, मुंबई
प्रबंधक, महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्था, परेल, मुंबई
कल्याण आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
प्रबंधक, मुंबई विद्यापीठ, मुंबई.
सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
महालेखापाल - १ (लेखापरिक्षा /लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई.
महालेखापाल - २ (लेखापरिक्षा /लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर
अधिदान व लेखाधिकारी, मुंबई /निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
निवडनस्ती (कामगार-६)
उद्योग,ऊर्जा व कामगार विभागातील सर्व प्रधान सचिव, सह /उप सचिव, अवर सचिव व सर्व कार्यासने.